# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
## Maharashtra Public Service Commission

मुख्य कार्यालय : ५½, ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी - २२८२१७२८, २२८२११६७
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२. फॅक्स : २२६७३९१५

ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in


**दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) व न्यायदंडाधिकारी (प्रथमवर्ग) (पूर्व) परीक्षा -२०१५**

**जाहिरात क्रमांक : १ /२०१५ क्रमांक सीजेपी- १११५/सीआर-१/२०१४/ बारा**

**दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) व न्यायदंडाधिकारी (प्रथमवर्ग) (पूर्व) परीक्षा -२०१५ रविवार, दिनांक ३१ मे,२०१५** रोजी औरंगाबाद, मुंबई व नागपूर या जिल्हाकेंद्रांवर घेण्यात येईल.

२. प्रस्तुत जाहिरातीत नमूद केलेल्या अटींची पूर्तता करणा-या उमेदवारांकडून **ऑनलाईन** पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. पूर्व परीक्षेत अर्हताप्राप्त ठरणा-या उमेदवारांना मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येईल.

३. अर्जामध्ये चुकीची माहिती सादर करणा-या उमेदवारांना सदर परीक्षेसाठी व या पुढील सर्व निवडीसाठी आयोग अपात्र ठरवू शकेल.

४. **उपलब्ध पदसंख्या** :- २२७. सदर पदसंख्येत शासनाच्या संबंधित विभागाच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे.

५. वेतनश्रेणी :- रु. २७,७०० – ४४,७७० अधिक नियमानुसार देय भत्ते.

६. **पात्रतेच्या अटी** :- **वयोमर्यादा आणि अर्हता** –

**६.१ वकील, ॲटर्नी किंवा अधिवक्ता यांचेकरिता** :-

**६.१.१ वयोमर्यादा** :- दि. १ जुलै, २०१५ रोजी २१ वर्षांपेक्षा कमी आणि ३५ वर्षांपेक्षा जास्त नसावे.

**६.१.२ अर्हता** : -

(१) विधी शाखेतील पदवी आणि उच्च न्यायालयातील किंवा त्यास दुय्यम असलेल्या न्यायालयातील दिनांक ३ मार्च, २०१५ रोजी वकील, ॲटर्नी किंवा अधिवक्ता म्हणून किमान ३ वर्षांचा वकिली व्यवसायाचा अनुभव.

(२ ) पब्लिक प्रॉसिक्युटर या पदावरील महाराष्ट्रातील सेवा न्यायालयीन व्यवसाय म्हणून समजली जाईल **किंवा**

**६.२ नवीन विधी पदवीधरांकरिता** :-

**६.२.१ वयोमर्यादा** :- दि. १ जुलै, २०१५ रोजी २१ वर्षांपेक्षा कमी आणि २५ वर्षांपेक्षा जास्त नसावे.

**६.२.२ अर्हता** :-

(१) विधी शाखेतील पदवी. सदर पदवी प्राप्त करण्यासाठी घेण्यात येणारी प्रत्येक परीक्षा प्रथम प्रयत्नात उत्तीर्ण करुन पदवी प्राप्त केली असली पाहिजे **आणि**

(२) विधी पदवीचे अंतिम वर्ष किंवा विधीमधील पदव्युत्तर पदवीचे अंतिम वर्ष (L.L.M.) किमान ५५ % इतक्या गुणांनी दिनांक ३ मार्च, २०१५ रोजी वा पूर्वी उत्तीर्ण असणे आवश्यक **किंवा**

६.३ उच्च न्यायालयाच्या लिपिकवर्गीय कर्मचारी वर्गाचे सदस्य **किंवा**

६.४ उच्च न्यायालयास दुय्यम असलेल्या न्यायालयाच्या लिपिकवर्गीय कर्मचारी वर्गाचे सदस्य **किंवा**

६.५ मंत्रालयाच्या विधी व न्याय विभागाच्या विधी विभागामध्ये विधी सहायक वा त्यापेक्षा वरिष्ठ म्हणून काम करणा-या कर्मचारी वर्गाचे सदस्य **किंवा**

६.६ उच्च न्यायालय, शहर दिवाणी न्यायालय आणि जिल्हा न्यायालये यामधील सरकारी वकिलांच्या कार्यालयातील लिपिकवर्गीय कर्मचारी वर्गाचे सदस्य.

**६.७ उपरोक्त ६.३, ६.४, ६.५ व ६.६ यांचेकरिता वयोमर्यादा** :- दि. १ जुलै, २०१५ रोजी वय २१ वर्षांपेक्षा कमी व ४५ वर्षांपेक्षा जास्त नसावे. तथापि, विधी पदवी प्राप्तीनंतर दि. ३ मार्च, २०१५ पर्यंत त्यांनी किमान ३ वर्षांची सेवा केलेली असणे आवश्यक आहे.

६.८ (१) मागासवर्गीय उमेदवारांबाबत उच्च वयोमर्यादा ५ वर्षांपर्यंत शिथिलक्षम.

(२) दिनांक १ जानेवारी, १९६४ ते २५ मार्च, १९७१ या कालावधीत तत्कालीन पूर्व पाकिस्तानातून स्थलांतरीत झालेले लोक, दिनांक १ नोव्हेंबर, १९६४ नंतर श्रीलंकेतून भारतात स्थलांतरीत झालेले मूळ भारतीय आणि १ जून, १९६३ नंतर ब्रम्हदेशातून भारतात स्थलांतरीत झालेले मूळ भारतीयांच्या बाबतीत वयोमर्यादा ३ वर्षाने शिथिलक्षम.

**६.९ अंध उमेदवार सदर पदासाठी पात्र नाहीत.**

७. **मराठी भाषेचे ज्ञान** :-

७.१ प्रस्तुत पदासाठी उपरोक्त सर्व गटातील उमेदवाराला मराठी भाषा उत्तम रितीने बोलता, वाचता व लिहिता येणे आवश्यक असून मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान त्याचप्रमाणे मराठीतून इंग्रजीत व इंग्रजीतून मराठीत सफाईदारपणे भाषांतर करता येणे आवश्यक आहे.

७.२ वरीलप्रमाणे मराठी भाषेच्या ज्ञानाबददलचे प्रमाणपत्र खालील प्राधीका-यांकडून प्राप्त करणे आवश्यक आहे :-

(१) वकिल, ॲटर्नी किंवा अधिवक्ता यांचेबाबतीत- संबंधित जिल्हयाचे मुख्य न्यायाधीश.

(२) नवीन विधी पदवीधरांबाबतीत - विधी अभ्यासक्रमासाठी (LLB/LLM ) प्रवेश घेतलेल्या महाविद्यालयाचे प्राचार्य किंवा महाविद्यालय किंवा विद्यापीठाचे विभागप्रमुख.

(३) उच्च न्यायालय आणि त्यास दुय्यम न्यायालये, मंत्रालय इत्यादी विभागातील कर्मचारी वर्गाच्या सदस्यांच्या बाबतीत – ज्यांच्या नियंत्रणाखाली सेवेत आहे अशा विभाग / कार्यालय प्रमुख.

(४) विशेष परिस्थितीत पुनर्नियुक्त/ सेवानिवृत्त दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर )

७.३ उमेदवाराने शासनाच्या नियमानुसार नियुक्तीनंतर सहा महिन्याच्या आत मराठी भाषेची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

८. **परीक्षेचे टप्पे** :-

८.१ सदर परीक्षा एकूण तीन टप्प्यात घेण्यात येईल :- (१) पूर्व परीक्षा (२) मुख्य परीक्षा (३) मुलाखत

८.२ पूर्व परीक्षा :-

८.२.१ परीक्षेचे स्वरुप :- वस्तुनिष्ठ बहुपर्यायी, प्रश्नपत्रिका-एक.

८.२.२ एकूण गुण - १००

८.२.३ परीक्षेचे माध्यम- इंग्रजी

८.२.४ **पूर्व परीक्षेचा अभ्यासक्रम** :-

(१ ) कोड ऑफ क्रिमिनल प्रोसिजर (२) सिव्हिल प्रोसिजर कोड (३) इव्हिडन्स ॲक्ट (४) ट्रान्सफर ऑफ प्रॉपर्टी ॲक्ट (५) स्पेसिफिक रिलीफ ॲक्ट (६) महाराष्ट्र रेन्ट कन्ट्रोल ॲक्ट (७ ) लिमिटेशन ॲक्ट (८ ) कॉन्स्टिटयुशन ऑफ इंडिया (९) इंडियन पिनल कोड (१०) लॉ ऑफ कॉन्ट्रॅक्ट, सेल ऑफ गुडस ॲक्ट ॲन्ड पार्टनरशिप ॲक्ट.

८.२.५ पूर्व परीक्षा ही मुख्य परीक्षेकरिता उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याच्या उददेशाने घेण्यात येईल. गुणवत्तेनुसार एकूण पदसंख्येच्या साधारणपणे दहा पट उमेदवार मुख्य परीक्षेसाठी पात्र ठरविण्यात येतील.

८.२.६ सदर पूर्व परीक्षा ही चाळणी परीक्षा असल्याने पूर्व परीक्षेचे गुण अंतिम निवडीसाठी विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच ते उमेदवारांनाही कळविले जाणार नाहीत.

८.२.७ सदर परीक्षेकरिता व या पदांच्या मुख्य परीक्षेला व निवडीला आयोगाच्या दि. १९ सप्टेंबर, २०१४ व २५ सप्टेंबर, २०१४ च्या घोषणा व पुनर्घोषणा लागू राहणार नाहीत.

८.३ **मुख्य परीक्षा** :-

८.३.१ एकूण गुण. २००

८.३.२ प्रश्नपत्रिका – दोन. प्रत्येकी १०० गुणांचे दोन पेपर

८.३.३ परीक्षेचे माध्यम- मराठी व इंग्रजी

८.३.४ मुख्य परीक्षेकरिता आयोगाने विहित केलेल्या किमान सीमारेषा किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणा-या उमेदवारांस मुलाखतीस बोलविण्यात येईल.

८.३.५ प्रत्येक विषयात किमान ५० गुण मिळवणारे उमेदवार मुलाखतीस पात्र ठरतील.

८.३.६ अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती उमेदवारांच्या बाबतीत प्रत्येक विषयात किमान ४५ गुण मिळवणारे उमेदवार मुलाखतीस पात्र ठरतील.

८.४ **मुलाखत – ५० गुण** :- मुलाखतीत किमान ४० % गुण प्राप्त करणा-या उमेदवारांचा अंतिम निवडीसाठी विचार होईल.

८.५ **अंतिम निवड** :- लेखी मुख्य परीक्षा व मुलाखतीमध्ये प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे उमेदवारांची अंतिम निवड करण्यात येईल.

९. लेखी परीक्षेच्या कालावधीत नक्कल किंवा गैरवर्तणूक केलेल्या किंवा फौजदारी केसेसमध्ये शिक्षा झालेल्या किंवा न्यायिक सेवेतून सक्तीने सेवानिवृत्त केलेल्या / काढून टाकलेल्या किंवा बडतर्फ केलेल्या किंवा न्यायिक सेवेचा प्रशिक्षण कालावधी यशस्वीरित्या पूर्ण न करणारा उमेदवार प्रस्तुत स्पर्धापरीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र असणार नाही.

१०. प्रस्तुत जाहिरातीच्या दिनांकापर्यंत संपादन केलेली अर्हता व अनुभव सदर पदासाठी पात्रता व पुढील निवडीसाठी विचारात घेण्यात येईल. सक्षम विद्यापीठाकडून संबंधित परीक्षेचा निकाल जाहीर झाल्याच्या दिनांकास शैक्षणिक अर्हता संपादन केली आहे असे समजले जाईल.

११. दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर ) व न्यायदंडाधिकारी (प्रथमवर्ग ) म्हणून निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्तीच्यावेळी सदर पदावर तीन वर्षे कार्यरत राहणार आहे, याबाबतचे रु. २,००,०००/- (रु. दोन लाख ) एवढया रकमेचे बंधपत्र लिहून देणे आवश्यक राहील.

१२. **शुल्क** :-

१२.१ :- **अमागास** - **रु. ३६५/-** १२.२ :- मागासवर्गीय - **रु. २६५/-**

१३. **अर्ज करण्याची पद्धत** :-

१३.१ प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत..

१३.२ पात्र उमेदवाराला वेब-बेस्ड (Web-based)ऑनलाईन अर्ज https://mahampsc.mahaonline.gov.in या वेबसाईटद्वारे **दिनांक ३ मार्च, २०१५ ते दिनांक २३ मार्च, २०१५** या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील.

१३.३ ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या https://mahampsc.mahaonline.gov.in तसेच www.mpsc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

१३.४ विहित पद्धतीने आयोगास अर्ज सादर केल्यानंतर परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

१३.५ परीक्षा शुल्काचा भरणा करण्याकरिता उमेदवारांनी खाली नमूद केलेल्या पद्धतींचा अवलंब करावा :-

(१) शुल्क भरण्याकरिता मुख्य पृष्ठाच्या डाव्या भागावरील **माझे खाते** या लिंक वर क्लिक करावे.

(२) **" माझे खाते "** या लिंक वर क्लिक केल्यानंतर उमेदवाराने **माझे ॲप्लीकेशन** सदरातील **स्पर्धात्मक परीक्षा** या लिंक वर क्लिक करावे.

(३) **स्पर्धात्मक परीक्षा** या लिंक वर क्लिक केल्यानंतर अर्ज केलेल्या पदांची यादी शुल्क भरल्याच्या / न भरल्याच्या नोंदीसह दिसेल. ज्या पदासमोर Unpaid " असे लिहिलेले असेल, त्या ठिकाणी Pay Now " अशी लिंक उपलब्ध असेल.

(४) " Pay Now " या लिंक वर क्लिक केल्यानंतर तीन पर्याय उपलब्ध होतील. (अ) ऑनलाईन पेमेंट (ब) नागरी सुविधा केंद्र (क) चलनाद्वारे

(५) क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड अथवा नेटबँकिंगच्या सहाय्याने ऑनलाईन परीक्षा शुल्क अदा करता येईल.

(६) नागरी सुविधा केंद्र हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या पावतीची प्रत घेऊन नागरी सुविधा केंद्र अथवा संग्राम केंद्रात जाऊन शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो. उपरोक्त कार्यवाही अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी पूर्ण करणे आवश्यक राहील.

(७) चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरण्याचा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत, बँकेच्या कार्यालयीन वेळेत शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो.

(८) भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे शुल्क भरण्याचा पर्याय निवडल्यास अर्ज सादर केल्याच्या दोन तासानंतर अथवा शेवटच्या दिवशी अर्ज सादर करणा-या उमेदवारांनी त्यापुढील कामकाजाच्या दिवशी बँकेच्या कार्यालयीन वेळेत परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

१३.६ **केंद्र निवड** :-

१३.६.१ परीक्षा शुल्काचा भरणा केल्यानंतर परीक्षा केंद्राची निवड करणे आवश्यक आहे. त्याकरिता माझे खाते मधील संबंधित परीक्षेची निवड करावी. त्यानंतर केंद्र निवडा या पर्यायावर क्लिक करावे. सदर पर्यायांतर्गत निवडलेल्या केंद्राची क्षमता दर्शविली जाईल. केंद्राच्या क्षमतेइतक्या उमेदवारांचे अर्ज तत्पूर्वी प्राप्त झाले असतील, तर सदर केंद्र उपलब्ध नसून, दुसरे केंद्र निवडावे, असा संदेश प्राप्त होईल. केंद्राची निवड केल्यानंतर सेव्ह बटनावर क्लिक केल्यास केंद्र निवडीची व अर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण होईल.

१३.६.२ भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाव्दारे शुल्क भरण्याचा पर्याय निवडलेले उमेदवार शुल्क भरल्याच्या दिनांकाच्या दुस-या दिवशी केंद्र निवडीची प्रक्रिया करु शकतील. दुसरा दिवस कार्यालयीन सुटटी अथवा रविवारचा असेल तर उमेदवार सदर कार्यवाही त्यानंतर लगेच येणा-या पुढील कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी करु शकतील.

१३.७ प्रस्तुत परीक्षेपूर्वी सर्वसाधारणपणे ७ दिवस अगोदर प्रवेशप्रमाणपत्र उमेदवाराच्या प्रोफाईलद्वारे उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याची प्रत उमेदवाराने परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

१४.        परीक्षेच्या वेळी उमेदवाराने प्रवेशप्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय, परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

१५. प्रस्तुत जाहिरातीमध्ये परीक्षेसंदर्भातील संक्षिप्त तपशिल दिलेला आहे. पूर्व परीक्षेच्या प्रवेशासाठी माहिती , अर्ज स्वीकारण्याची पध्दत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया,परीक्षा योजना, अभ्यासक्रम इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशिलासाठी आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवरील स्पर्धा परीक्षेअंतर्गत " उमेदवारांना सर्वसाधारण सूचना " तसेच " परीक्षा " विभागातील " दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) व न्यायदंडाधिकारी परीक्षा" मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन करावे.

१६. सदर जाहिरात आयोगाच्या https://mahampsc.mahaonline.gov.in व www.mpsc.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे. आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आलेली माहिती व जाहिरात अधिकृत समजण्यात येईल.

१७. विहित पध्दतीने अर्ज सादर करुन शुल्क भरण्याची तसेच स्टेट बँकेमध्ये परीक्षा शुल्क भरण्याकरिता चलनाची प्रत घेण्याची कार्यवाही **दिनांक २३ मार्च, २०१५ रोजी २३.५९** वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.

१८. चलनाद्वारे **परीक्षाशुल्क भरावयाचे झाल्यास** भारतीय स्टेट बँकेमध्ये दिनांक २४ मार्च, २०१५ पर्यंत बँकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे बंधनकारक आहे. विहित दिनांकानंतर परीक्षा **शुल्क** भरल्यास वैध मानले जाणार नाही, तसेच परीक्षा **शुल्काचा** परतावाही केला जाणार नाही.

१९. **दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) व न्यायदंडाधिकारी (प्रथमवर्ग) (पूर्व) परीक्षेचा अभ्यासक्रम** आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

ठिकाण : मुंबई

दिनांक : **३ मार्च,२०१५**.

**श्री. शं. पाठक**

उपसचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग.

**(१) आयोगाच्या कार्यालयात, परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात तसेच शारिरीक चाचणी व मुलाखतीच्या वेळी मोबाईल फोन अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक्स साधने आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे.**

**(२) मुलाखतीच्यावेळी सर्व आवश्यक मूळ प्रमाणपत्र सादर न केल्यास सदर परीक्षेची उमेदवारी नाकारली जाईल.**